महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण, १९९६
महाराष्ट्रातील द्रोणाचार्य, अर्जुन,
शिवछत्रपती व दादोजी कोंडदेव
पुरस्कारार्थींना महाराष्ट्र राज्यांतर्गत विनामूल्य
ओस.टी. प्रवास सवलत देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्र. राक्रीयो-१०९६/प्र.क्र. ३३०/क्रीयुसे-१.
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २७ फेब्रुवारी १९९८

प्रस्तावना.---राज्यातील अधिकाधिक तरुण-तरुणींना खेळाकडे आकृष्ट करण्यासाठी व राज्यातील खेळाडूंचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी व त्यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी अनेक उपाययोजना करण्याचा शासनाने राज्य क्रीडा धोरणात निर्णय घेतला आहे. त्या अंतर्गत द्रोणाचार्य पुरस्कार, अर्जून पुरस्कार, दादोजी कोंडदेव पुरस्कार, व शिव छत्रपती पुरस्कारार्थींना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळाच्या बसमधून राज्यांतर्गत विनामूल्य प्रवास करण्यासाठी सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय.---महाराष्ट्र राज्यातील द्रोणाचार्य, अर्जुन, दादोजी कोंडदेव व शिवछत्रपती पुरस्कारार्थींना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसमधून महाराष्ट्र राज्यांतर्गत विनामूल्य प्रवास करण्यासाठी व त्यासाठी आवश्यक ते ओळखपत्र देण्यासाठी शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

२. या सवलतीसाठी पुरस्कारार्थींना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सर्वसाधारण/निमआराम/आराम गाड्यातून प्रवास करण्यास अनुमती असेल.

३. ओळखपत्रासाठी त्यांनी महाराष्ट्रात किमान १५ वर्षे रहिवासी असल्याचे वास्तव्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

४. ही सवलत घेणाऱ्या प्रत्येक पुरस्कारार्थींमागे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ओळखपत्रांच्या संख्येनुसार शासनाच्या क्रीडा विभागाने प्रतिवर्षी प्रतिव्यक्ति कमाल रु. पाचशे या दराने प्रतिपूर्ती करावी.

५. संचालक, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना संबंधित पुरस्कारार्थींना ओळखपत्र देण्याचे अधिकार राहतील.

६. संचालक, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

७. यावर होणारा खर्च " २२०४-क्रीडा व युवकसेवा १०४-क्रीडा व खेळ (नऊ) (बी) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (तीन) नावाजलेल्या खेळाडूंना त्यांच्या वृद्धापकाळात आर्थिक सहाय्य (२२०४०६७१) या लेखाशिर्षाखाली त्या त्या वर्षी केलेल्या मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

८. हे आदेश शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील व पुढील आदेश होईपर्यंत अंमलात राहतील.

एच-1438(क)(1200-3-98)

(कृ.मा.प.

३१५

हा शासन निर्णय गृह विभाग (परिवहन) नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने व अनौपचारि संदर्भ क्र. प्र.क्र. १७२२२/व्यय-११, दिनांक २३ सप्टेंबर १९९७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

रमेशचंद्र कानडे

(रमेशचंद्र कानडे)
सचिव,
महाराष्ट्र शासन.

प्रति,
(१) संचालक, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
(२) उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, मुंबई/नाशिक, कोल्हापूर/औरंगाबाद/नागपूर/पुणे,
(३) सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य,
(४) सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी, महाराष्ट्र राज्य,
(५) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई,
(६) महालेखापाल, महाराष्ट्र१ (लेखा व परिरक्षण), मुंबई,
(७) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर,
(८) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व परिरक्षण), नागपूर,
(९) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
(१०) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य,
(११) वित्त विभाग, व्य-११, मंत्रालय, मुंबई,
(१२) शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
(१३) गृह विभाग (परिवहन), मंत्रालय, मुंबई,
(१४) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.ऊ
(१५) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई,
(१६) सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
(१७) सर्व पालिका आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
(१८) मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
(१९) मा. राज्यमंत्री, (क्रीडा), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
(२०) निवड नस्ती (क्रीयुसे-१).